नि.दि.दा.क्र. १७९/२०१३
बळवंत व इतर वि. सचिन व इतर

## निशाणी क्र. ६६ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.८ चे वारस रेकॉर्डवर घेवुन दाव्यात तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द जाहीर ठराव, निरंतर ताकीद व वैकल्पीकरीत्या वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.८ चारुशीला नरेश कदम या दि.२६.०२.२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.८ यांन अर्जात नमुद केलेले प्रतिवादी क्र.८अ व ८ ब हे वारस आहेत. दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.८ चे नावापुढे 'मयत वारस' असा शब्द लिहण्यात यावा.सदरची दुरुस्ती ही किरकोळ व तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, वादींनी अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करण्यास परवागनी मिळण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र.८ चे वारसांना नि.क्र.७४ नुसार साक्ष समन्स काढुनही ते दाव्यात हजर झालेले नाहीत त्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात येते आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा जाहीर ठराव, निंरतर व तुर्तातुर्त ताकीद मिळणेकामी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ८ चारुशीला नरेश कदम या दि.२६.०२.२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत नि.क्र.७० वर दाखल आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप

पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र.८ चे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द वादींना मयत प्रतिवादी क्र.८ चे वारस म्हणून घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता त्यांचे अर्जात नमुद केलेले वारस रेकॉर्डवर घेवुन दाव्यात तशी दुरुस्ती करण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

## <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र.६६) मंजूर करण्यात येतो.

२. वादींना मयत प्रतिवादी क्र.८ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी सदरचा आदेश झाल्यापासुन दाव्यात तशी दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

स्थळ : वाई (आर.एम.भेंडे)
दिनांक : २९.०१.२०२४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.

**CERTIFICATE**

" I certify that this Order uploaded is a true and correct copy of original signed Order".

Order dictated on : 29.01.2024.

Order checked and signed on : 29.01.2024.

Uploaded by : S. S. Kumbhar.
Stenographer (Grade-III)

Uploaded on : 29.01.2024.